प्रति,

दै.------------------------------

नांदेड, लातुर व नजिकच्या जिल्हयात मुले पळविणारी टोळी आली असुन, नागरिकांनी त्यांचेवर हाल्ला केला व त्यात एकजण ठार झाल्याची बातमी काही प्रसार माध्यमातुन प्रसारीत झाली आहे. परंतू सदर घटना कर्नाटक राज्यातील बीदर जिल्हयातील कमलानगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडलेली असुन यापुर्वीही महाराष्ट्रातील काही जिल्हयात केवळ आफवामुळे निष्पाप, फिरस्ते,वाटसरु, भिकारी यांना जबर मारहान किंवा खून करण्याच्या घटना घडल्या आहेत. नांदेड जिल्हयात आजपावेतो अशी कोणतीही घटना घडलेली नाही, सर्व नांदेड जिल्हयातील नांगरिकांना अवाहन करण्यात येते की, कोणत्याही सोशल मिडीयांतील, वॅाटस्अप मधील अफवेवर विश्वास न ठेवता, कोणी संशयित व्यक्ती, इसम, लोक फिरताना आढळल्यास तात्काळ नजिकच्या पोलीस स्टेशनशी संपर्क करावा, कोणाच्याही हातून गैरसमजुतीने अगर अफवावर विश्वास ठेऊन अशा संशयित व्यक्तीवर हल्ला करुन जिवीत अथवा शारिरीक हानी करुन कायद्याचे उल्लघंन होणार नाही याची सर्व नागरिकांनी दक्षता घ्यावी.

समाजातील सर्व स्थरातील सजग नागरिक, सामाजिक कामकरणाऱ्या संस्था, राजकिय नेते, पदाधिकारी, व्यापारी, वकील, पत्रकार, सर्व शासकिय अधिकारी, कर्मचारी व सार्वजनिक ठिकाणी वावरणाऱ्या सर्वानी यासंदर्भात नागरिकांना प्रबोधन शक्य त्या ठिकाणी करावे विशेषतःग्रामीण भागात सर्वानी जागरुकता निर्माण करावी व केवळ आफवामुळे कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता घ्यावी असे आवाहन करण्यात येत आहे.

चंद्रकिशोर मीणा
पोलीस अधीक्षक,नांदेड